पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८०**

(सभावृत्तांत)

**दिनांक – १५/०७/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार दिनांक **१५/०७/२०२०** रोजी दु.**०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत सन्मा. सदस्य आणि संबंधित अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
५. मा.कलाटे राहूल तानाजी
६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
८. मा.संतोष बबन कांबळे
९. मा.अभिषेक गोविंद बारणे
१०. मा.बुर्डे सुवर्णा विकास
११. मा.फुगे भिमाबाई पोपट
१२. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त (१), मा.पवार – अति.आयुक्त (२), मा.तुपे – प्र.अतिरिक्त आयुक्त (३) तथा सह शहर अभियंता (वि/यां), मा.सुभाष इंगळे – उप आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.कोळंबे – लेखा व वित्त अधिकारी हे सभागृहात उपस्ति राहून तसेच मा.पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.भालकर, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.जोशी, मा.दुरगुडे, मा.बोदडे – सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – प्र.मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता YCMH, मा.खाबडे, मा.गलबले, मा.ओंभासे, मा.पुजारी, मा.भोसले, मा.देशमुख – कार्यकारी अभियंता, मा.बहुरे – प्रशासन अधिकारी हे अधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले -**

विषय क्र.१३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आण्णासाहेब मगर स्टेडियम मैदानामध्ये कोरोना (COVID -19) केअर सेंटर उभारणेकरिता विद्युत विषयक कामासाठी मे.ए.ई.पी.सिस्टम सोल्युशन्स प्रा.लि. यांची सल्लागार नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.१४) ठराव क्र.७१६० दि.१७/०६/२०२० दुरूस्ती बाबत – मा.भिमाबाई फुगे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१५) श्रीम.श्रुतिका बाग – मुंगी यांची Corporate Social Worker पदी नियुक्ती करणेबाबत. – मा.भिमाबाई फुगे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – ७२३७ | विषय क्रमांक – १

दिनांक – १५/०७/२०२० | विभाग – इ क्षेत्रिय, पाणीपुरवठा

सुचक – मा.भिमाबाई फुगे | अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.ईक्षेका/पापु/०१/कावि/२०५/२०२०,दि.२९/०४/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सन २०१८-१९ साठी "इ प्रभागातील विविध टाक्यांवरून पाणी पुरवठा करण्यासाठी मजुर पुरविणे (सन २०१८-१९)" या कामाचा आदेश ठेकेदार "मे.राजेश इंजिनिअर्स एंड कंपनी." यांना दिनांक २०/०९/२०१९ रोजी देणेत आला आहे. सदर कामाची मुदत १२ महिने म्हणजेच दिनांक १९/०९/२०२० पर्यंत आहे. सदर कामात मोशी, डुडुळगाव, च-होली, वडमुखवाडी, मॅगझीन, दिघी, बोपखेल, भोसरी, सात दहा व गवळीमाथा व पांजरपोळ टाकी इ. परिसरामध्ये पाणीपुरवठा वितरण व्यवस्था सुरळीत राहणेसाठी व्हॉल्व्ह ऑपरेशनसाठी मजुर कर्मचारी पुरविणे या कामाचा समावेश आहे.

**टेबल १ - अंदाजपत्रकीय रक्कम व तरतुद**

| अ क्र | सन | पान क्र. | अ. क्र | अंदाजपत्रकीय रक्कम रूपये | तरतुद रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१८-१९ | १४० | ४४ | १४०००००० | ७०००००० |
| २ | २०१९-२० मुळ अंदाज | | | १८०००००० | ९०००००० |
| ३ | २०१९-२० सुधारीत | ८६४ | ११ | १८०००००० | १८०००००० |
| ४ | २०२०-२१ मुळ अंदाज | ८६४ | ११ | १८०००००० | २००००० |
| ५ | २०२०-२१ सुधारीत प्रस्तावित | | | ३३०००००० | १५२००००० |

याकामास मा.महापालिका सभेची ठराव क्र.१७७, दि.२०/०४/२०१८ नुसार र.रू.१,०२,९१,९८२/- साठी तांत्रिक मान्यता घेणेत आली. मुळ प्रशासकिय मान्यता र.रु.१,४०,००,०००/- एवढी आहे. सदर कामास र.रु.१,०२,९१,९८२/- या खर्चास मा.स्थायी समिती ठराव क्र.५६६५ दि.१८/०९/२०१९ मान्यता घेण्यात आलेली आहे. सद्यस्थितित सदर काम ९५% पूर्ण झालेले आहे. अशाच प्रकारच्या कामाची निविदा प्रक्रिया जानेवारी २०२० मध्ये राबवलेली असून पुढील कार्यवाही चालू असताना या दरम्यान कोरोना विषाणूच्या (Covid-19) साथीच्या रोगामुळे संपूर्ण भारत देशात Lockdown घोषित झाल्यामुळे व तांत्रिक अडचण असल्यामुळे पुढील निविदा कार्यवाही थांबलेली आहे. सद्यस्थितीत चालू असलेल्या वर उल्लेख केलेल्या भागात पाणीपुरवठा करण्यासाठी चालू काम सुधारित करण्याची आवश्यकता असून नवीन कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, सदर काम मुळ मुदतीत चालू ठेवण्यासाठी या कामासाठी सुधारित खर्च र.रु.३,२९,१२,९०२/- इतकी येत आहे. तरी मुळ निविदा र.रु.१,०२,९१,९८२/- + वाढीव रक्कम रपये २,२६,२०,९२०/- + रॉयल्टी ची रक्कम रूपये ०/- तसेच मटेरीअल टेस्टींग चार्जेस रक्कम रूपये ०/- असे एकुण रक्कम रपये ३,२९,१२,९०२/- पर्यंत काम सुधारीत करणेस तसेच नियमानुसार वेळोवेळी कामगार कल्याण विभाग यांचेकडील परिपत्रकानुसार प्रसिद्ध होणारे किमान वेतन दर यांचे नुसार वाढ/ घट अदा करणेस तसेच निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागु असल्यास भाववाढ फरकाची रक्कम अदा/ वसुल करणेस मान्यता घेणे आवश्यक ठरते. त्यानुसार मूळ खर्चाच्या मान्यतेची र.रु.१,०२,९१,९८२/- वजा जाता येणा-या वाढीव खर्च र.रु.२,२६,२०,९२०/-तसेच नियमानुसार वेळोवेळी कामगार कल्याण विभाग यांचेकडील परिपत्रकानुसार प्रसिद्ध होणारे किमान वेतन दर यांचे नुसार वाढ/ घट अदा करणेस तसेच निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागु असल्यास भाववाढ फरकाची रक्कम अदा/ वसुल करणेचे टेबल १ व २ नुसारचे प्रस्तावास मा.स्थायी समितीची खर्चास व सुधारीत करारनामा करणेस मान्यता घेणे आवश्यक आहे.

**टेबल २ - वाढ घट तक्ता**

| अक्र | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पान क्र./ अनु क्र. | सन २०२०-२१ चा मूळ अंदाज र.रु. | वाढ करावयाची तरतूद र.रु. | घट करावयाची तरतूद र.रु. | सन २०२०-२१ साठी एकूण आवश्यक तरतूद र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लेखाशिर्ष - इ क्षेत्रीय कार्यालय पाणीपुरवठा विभाग महसुली खर्च "इ प्रभागातील विविधा टाक्यांवरून पाणी पुरवठा करण्यासाठी मजुर पुरविणे. (सन २०१८-१९)" | ८६४/११ | २००००० | १५०००००० | ० | १५२००००० |
| २ | "इ प्रभागातील विविधा टाक्या व संपवरून पाणी पुरवठा करणेकामी मजुर पुरविणे." | ८६६/२९ | १६०००००० | ० | १५०००००० | १०००००० |
| | एकूण | | १६२००००० | १५०००००० | १५०००००० | १६२००००० |

तरी सदर कामासाठी येणारा वाढीव खर्च र.रु.२,२६,२०,९२०/-(अक्षरी र.रू.दोन कोटी सव्वीस लाख वीस हजार नऊशे वीस फक्त) व तसेच नियमानुसार वेळोवेळी कामगार कल्याण विभाग यांचेकडील परिपत्रकानुसार प्रसिद्ध होणारे किमान वेतन दर यांचे नुसार वाढ/ घट अदा करणेस तसेच निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच अंतर्गत वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२३८ विषय क्रमांक – २

दिनांक – १५/०७/२०२० विभाग – झो.नि.पु.स्थापत्य

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३७१/२०२०, दि.२५/०६/२०२०

विषय – सन २०१९-२० मधील व त्यापुर्वीच्या चालु असलेल्या विकास कांमांची बिले अदा करणेबाबत.

विषय क्र.२ मागे घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२३९ विषय क्रमांक – ३

दिनांक – १५/०७/२०२० विभाग – आरोग्य

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे पत्र क्र.आमुका/२/कावि/११३/२०२०, दि.२९/०६/२०२०

मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दापोडी येथील मुस्लिम दफनभुमिमध्ये प्रतिदिन ०३ काळजीवाहक पुरविणेकामी पिंपरी- चिंचवड मुस्लिम वेल्फेअर ईदगाह व कब्रस्तान कमिटी, नेहरुनगर या संस्थेची नियुक्ती करणेत आली होती. त्यांचे कामाची मुदत दि.३१/१२/२०१९ रोजी संपुष्टात आली आहे. त्यामुळे सदरचे कामासाठी सद्यस्थितीत कार्यरत संस्थेस मुदतवाढ देणे आवश्यक आहे. सदरचे कामाची मुदत संपुष्टात आल्याने, सद्यस्थितीत कार्यरत संस्था पिंपरी-चिंचवड मुस्लिम वेल्फेअर ईदगाह ॲन्ड कब्रस्तान कमिटी, नेहरुनगर यांनाकिमान वेतन दराने ०३ काळजीवाहक प्रतिदिन पुरविणेच्या कामासाठी माहे जानेवारी २०२० या ०१ महिना कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे र.रु.७०,२४२/- (अक्षरी र.रु.सत्तर हजार दोनशे बेचाळीस फक्त) अथवा शासन निर्णयानुसार भविष्यात किमान वेतन दरामध्ये वाढ झाल्यास त्यानुसार प्रत्यक्ष होणा-या खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३(क) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७२४० विषय क्रमांक – ४
दिनांक – १५/०७/२०२० विभाग – ह क्षेत्रिय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.हक्षेका/वि/कावि/१४२/२०२०, दि.१७/०६/२०२०

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

माहे मार्च २०२० मध्ये जगभरात कोरोना विषाणूचा प्रसार झाल्याने लॉकडाऊन जाहीर करण्यात आले व संचारबंदी लागू करण्यात आली. सन २०१९-२० मध्ये एकूण १३ कामांची बिले अदा करणे प्रलंबित होती. परंतु वरील आपत्कालीन परिस्थीमुळे सदरची बिले अदा करता आलेली नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ह क्षेत्रिय कार्यालय विद्युत विभागांतर्गत सन २०१९-२० मधील व त्यापूर्वीच्या चालू असलेल्या विकास कामांची बिले प्रस्तावात नमुद प्रमाणे संबंधितांस महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम १०२ अन्वये अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२४१ विषय क्रमांक – ५
दिनांक – १५/०७/२०२० विभाग – अ क्षेत्रिय, विद्युत
सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.अक्षेकार्य/२२०/२०२०, दि.१६/०६/२०२०

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागांतर्गत सन २०१९-२० मधील व त्यापूर्वीच्या चालू असलेल्या कामांची बिले संबंधितांस माहे मार्च २०२० अखेर अदा करणे आवश्यक होते. माहे मार्च २०२० मध्ये जगभरात कोरोना विषाणूचा प्रसार झाल्याने लॉकडाऊन जाहीर करण्यात आले व संचारबंदी लागू करण्यात आली. सन २०१९-२० मध्ये अ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत एकूण ०३कामांची बिले अदा करणे प्रलंबित होती. परंतु वरील आपत्कालीन परिस्थीमुळे सदरची बिले अदा करता आलेली नाही. सबब सन २०१९-२० च्या आर्थिक वर्षातील रक्कमा त्या कामावर खर्ची न झालेने मागील वर्षातील रक्कमा शिल्लक आहेत. या शिल्लक रक्कमेतून अ क्षेत्रीय कार्यालय विद्युत विभागाकडील एकूण ०३ कामांची बिले अदा करणेकामी र.रु.१२,३०,२६८/- (अक्षरी र.रू. बारा लाख तीस हजार दोनशे अड्ड्सष्ठ फक्त) ची आवश्यकता आहे. सोबत कामनिहाय यादी जोडणेत आली आहे. खालील तक्त्यात नमूद केलेनुसार लेखा विभागाकडे उपलब्ध असलेल्या मागील वर्षाच्या शिल्लक/अखर्चित रक्कमेतुन सदर बिले अदा करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १०२ नुसार सदर रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | पानांक व अ.क्र. | कामाचे नाव | 2019-20 चा सुधारीत तरतूद | दिनांक 31/03/2020 पर्यंत झालेला खर्च | दिनांक 31/03/2020 अखेर अदा न करता आलेल्या देयकाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | किरकोळ देखभाल दुरूस्ती | 789/58 | अ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत निगडी प्राधिकरण उप विभागामधिल से. क्र. 26, 27 व 28 येथील विविध उद्यानात कारंजे व धबधबे यांचे चालन व देखभाल दुरूस्ती करणे (1918-19) | 800000 | 0 | 3,97,207/- |
| २ | किरकोळ देखभाल दुरूस्ती | 789/60 | अ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत निगडी प्राधिकरण उप विभागामधिल प्रभाग क्र. 14 येथील विविध उद्यानात कारंजे व धबधबे यांचे चालन व देखभाल दुरूस्ती करणे (1918-19) | 800000 | 0 | 6,18,167/- |
| ३ | किरकोळ देखभाल दुरूस्ती | 789/63 | अ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत आकुर्डी एमआयडीसी उप विभागातील विविध उद्यानात कारंजे व धबधबे यांचे चालन व देखभाल दुरूस्ती करणे (1918-19) | 400000 | 0 | 2,14,894/- |
| | | | | | **एकूण** | 1230268/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२४२ विषय क्रमांक – ६

दिनांक – १५/०७/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा. संतोष कांबळे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मभां/१५/कावि/२८५/२०२०, दि.०४/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा(COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी विविध ठिकाणी देखरेखीखाली असणा-या (Institutional Quarantine) व Covid Care Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना व मनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी र.रु.250/- प्रति दिन प्रति व्यक्ति (अक्षरी र.रू.दोनशे पन्नास फक्त) याप्रमाणे दि.25/03/2020 ते दि.15/06/2020 अखेर मे.टॅब किचन यांना अदा करणेत आलेल्या रुपये 25,41,543/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.टॅब किचन, बाणेर रोड, पुणे 45 यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७२४३ विषय क्रमांक – ७

दिनांक – १५/०७/२०२० विभाग – क क्षेत्रिय

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ –मा.क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.कक्षेका/आ/१५/कावि/२७९/२०२०,दि.०६/०७/२०२०

मा.क्षेत्रिय अधिकारी यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील औष्णिक धुरिकरणासाठी डिझेलवर चालणारे दोन तीन चाकी रिक्षा टेम्पो (तीन रिक्षा टेम्पो) वाहनचालकासह भाडयाने पुरविणेकामी मा.अति.आयुक्त यांचेकडील दिनांक २५/०२/२०२० चा मान्य प्रस्तान्वये दि.२४/०२/२०२० ते दि.२३/०५/२०२० अखेर ०३ महिने कालावधीकरीता मे.अथर्व स्वयंमरोजगार औद्यागीक सेवा. सहकारी संस्था.मर्या. यांना क क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात औष्णिक धुरीकरण करणे या कामाकाजाकरीता प्रति दिन प्रति रिक्षा टेम्पो र.रू.५३९/- या दराप्रमाणे काम करून घेणेस मान्यता देणेत आलेली आहे. मा.स्थायी समिति ठराव क्र.७००८ दिनांक ०८/०५/२०२० अन्वये प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत आली आहे. मे.अथर्व स्वयंमरोजगार औद्यागीक सेवा.सहकारी संस्था. मर्या. यांना आदेश क्र. कक्षे/आ१५/कावि/२६२/२०२० दि.२५/०६/२०२० अन्वये दि.२४.०२.२०२० ते दि.२३.०५.२०२० या कालावधीसाठी आदेश देणेत आला असुन त्याप्रमाणे कामकाज करून घेणेत आलेले आहे. तथापी कोविड-19 प्रादुर्भाव असल्याने क-क्षेत्रीय कार्यालयामार्फत औष्णिक धुरीकरण कामाकरीता नविन निविदा कार्यवाही पुर्ण होणेस काही कालावधी लागणार असल्याने व कामाची तातडी व निकड लक्षात घेता पुढील कालावधीसाठी मे.अथर्व स्वयंमरोजगार औद्यागिक सेवा.सहकारी संस्था. यांना दिनांक २४.०५.२०२० पासुन तीन महिने अथवा नविन निविदा अंतिम होईपर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे. मे.अथर्व स्वयंमरोजगार औद्यागीक सेवा.सहकारी संस्था. मर्या. या संस्थेकडुन क क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात औष्णिक धुरीकरण करण्यासाठी वॅन फॉग मशिन ठेवुन कामकाज करण्यासाठी आवश्यक डिझेलवर चालणारे तीन चाकी रिक्षा टेम्पो (तीन रिक्षा टेम्पो) वाहन चालकासह भाड्याने घेणे करीता या कामाकाजाकरीता वाहने उपलब्ध करून घेवून त्या उपलब्ध तीन वाहनांच्या वाढीव खर्चास साधारण तीन महिन्याकरीता प्रति दिवस प्रति वाहन र.र १२१६/- प्रमाणे १ वाहनाचे २६ दिवसाचा खर्च र.रु.१४,०१४/- तीन वाहनाचे र.रु.४२,०४२/- प्रमाणे तीन महीन्यासाठी येणा-या खर्च र.रू.१,२६,१२६/- (अक्षरी र.रू.एक लाख सव्वीस हजार एकशे सव्वीस फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेबाबात मा.क्षेत्रिय अधिकारी यांची मागणी असली तरी, प्रस्तुत कामासाठी र.रू.१,२६,१२६/- (अक्षरी र.रू.एक लाख सव्वीस हजार एकशे सव्वीस फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. त्यापुढे खर्च झाल्यास मान्यतेसाठी स्वतंत्र प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७२४४ विषय क्रमांक – ८

दिनांक – १५/०७/२०२० विभाग – फ क्षेत्रिय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ –मा.क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/आ/२/कावि/२१५/२०२०, दि.०२/०७/२०२०

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील कोरोनाचा प्रार्दुभाव वाढल्याने सोडीयम हायपोक्लोराईड औषधाची व बॅक्टोडेक्सची हे जंतुनाशक वापरुन फवारणी करणे आवश्यक आहे. महर्षी वाल्मिकी स्वंय रोजगार सेवा सहकारी संस्था यांना औषध फवारणी करीता यापुर्वी पुरविणेत आलेल्या वाहनाच्या दरानेच कोविड -१९ कोरोना वायरसचा प्रार्दुभाव कमी होईपर्यत अथवा पुढील ६ महिन्याकरीता यापैकी जो कमी कालावधी असेल त्या कालावधी करीता दिवसभरासाठी एक नव्याने वाहन पुरविणेस या कामासाठी खर्च अंदाजे र.रु.८,१०,९००/- (अक्षरी र.रू.आठ लाख दहा हजार नऊशे फक्त) येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२४५ विषय क्रमांक – ९

दिनांक – १५/०७/२०२० विभाग – आपत्ती व्यवस्थापन

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आपव्य/१/कावि/४७०/२०२०, दि.०८/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पुर, भुकंप, वादळ, आपघातग्रस्त स्थिती व इतर नैसर्गिक आपत्तीच्या काळात नागरिकांना तातडीने मदत करणेकामी पिंपरी चिचंवड महानगरपालिका आस्थापनेवर आपत्ती व्यवस्थापन विभाग स्थापन करणेत आलेला आहे. आपत्कालिन परिस्थीती मध्ये आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कामकाजकरीता आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदावर श्री.ओमप्रकाश बहिवाल यांची र.रू.४०,०००/- फक्त चे एकत्रित मानधनावर आदेश क्र.आप.व्य/०१/कावि/१७/२०२० दि.१६/०१/२०२० अन्वये ०६ महिने कालावधीकरीता मुदतवाढीद्वारे नेमणूक करणेत आलेली आहे. सदरची मुदत दिनांक १५/०७/२०२० रोजी संपुष्टात येत आहे. कोवीद -१९ आजाराचा वाढता प्रादूर्भाव व पाऊस काळामधील अतिवृष्टी त्यामुळे उद्भवणारी पूरस्थिती व नैसर्गिक आपत्तीचा विचार करता, तसेच पुरनियंत्रण आराखडा २०२० चे कामकाजाचे आवश्यकता विचारात घेता तसेच आपत्ती व्यवस्थापन मनपाची वैधानिक जबाबदारी असल्यामुळे श्री.ओमप्रकाश बहिवाल यांना १ दिवस सेवा खंडीत करून दि.१७/०७/२०२० पासून पूढील ०६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणे आवश्यक आहे. श्री.ओमप्रकाश बहिवाल, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांना मुदत संपुष्टात येत असलेचे दिवसानंतर 1 दिवस सेवा खंडीत करून पूढील ०६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ व त्या कामी येणारा प्रत्यक्ष खर्च रक्कम रूपये २,४०,०००/- फक्त (प्रतिमहा ४०,०००/- प्रमाणे ६ महिने) चे खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सबब, श्री.ओमप्रकाश बहिवाल, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, यांना मुदत संपुष्टात येत

असलेचे दिवसानंतर 1 दिवस सेवा खंडीत करून पूढील ०६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ व त्या कामी येणा-या प्रत्यक्ष खर्च र.रू.२,४०,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख चाळीस हजार फक्त) (प्रतिमहा ४०,०००/- प्रमाणे ६ महिने) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२४६ विषय क्रमांक – १०

दिनांक – १५/०७/२०२० विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मातंवि/१२/कावि/१९३/२०२०, दि.२४/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

महानगरपालिकेच्या विविध कोवीड केअर सेंटरला निविदा सूचना क्रमांक १०/२०१९-२० चे मंजूर दरानुसार तातडीची बाब म्हणून थेट पध्दतीने ४ एम.बी.पी.एस. इंटरनेट लिझ लाईन प्रति कनेक्शनसाठी प्रति तिमाही र.रू.१७,७५०/- (अक्षरी र.रू.सतरा हजार सातशे पन्नास फक्त) अधिक जी.एस.टी. याप्रमाणे प्रत्यक्षात कनेक्शन संख्येनुसार येणा-या खर्चास निविदा न मागविता थेट पध्दतीने करणेस व त्या अनुशंगाने येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२४७ विषय क्रमांक – ११

दिनांक – १५/०७/२०२० विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचेकडील पत्र क्र.मुलेप/६/कावि/६०/२०२०, दि.१०/०७/२०२०

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखा परिक्षण विभागाकडील माहे जून २०२० अखेर संपणारा मासिक गोषवारा मा.मुख्य लेखा परीक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/६०/२०२०, दि.१०/०७/२०२० अन्वये पाठविलेल्या अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२४८ विषय क्रमांक – १२

दिनांक – १५/०७/२०२० विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचेकडील पत्र क्र.मुलेप/६/कावि/५९/२०२०, दि.१०/०७/२०२०

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील

दि.२९.०६.२०२० ते दि.०५.०७.२०२० अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/५९/२०२०, दि.१०/०७/२०२० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ७२४९ विषय क्रमांक – १३

दिनांक – १५/०७/२०२० विभाग – क क्षेत्रिय, विद्युत

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कक्षेका/वि/आ/८०१/२०२०, दि.१५/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क-क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील नेहरूनगर येथील आण्णासाहेब मगर स्टेडीयम मधील सुमारे५.१५ एकर एवढ्या क्षेत्रफळाच्या क्रिकेट स्टेडीयम च्या जागेवर “कोरोना” (COVID-19) रूग्णांच्या उपचारासाठी तात्पुरत्या स्वरूपाचे सुमारे २००० बेडचे रूग्णालय उभारणे बाबत मा.आयुक्त सो. यांनी सुचना दिलेल्या आहेत. त्यास अनुसरून या जागेवर “कोरोना” (COVID-19) केअर सेंटर उभारणे साठी विद्युतीकरण करणे, रोहित्रसंच बसविणे, जनित्रसंच बसविणे, अग्नी प्रतिबंधक यंत्रणा, पाण्याचे पंप तसेच वॉटर हिटर, वॉटर प्युरिफ़ायर, अंतर्गत CCTV यंत्रणा बसविणे आवश्यक आहे तसेच इतर आवश्यक कामे करावी लागणार आहेत. सदर कामे करणेकामी या कामांचे नियोजन, संकल्प चित्रे, प्रकल्प आराखडे, पुर्वगणनपत्रक, निविदा संच तयार करणे इ. निविदा पुर्व कामे करणेकरीता कामासाठी सल्लागार यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. “कोरोना” (COVID-19) या रोगा विरूध्दच्या लढाईमध्ये योगदान देणेच्या दृष्ट्रीकेनातून सदर कामासाठी आवश्यक निविदा पुर्व कामे फक्त रक्कम रू.१/- एवढा मोबदला घेऊन करणेस तयार असलेबाबतचे पत्र मे.एम.इ.पी. सिस्टीम सोलुशन्स प्रा. लि. यांनी दि.१५ जुलै,२०२० रोजी मनपास दिलेले आहे. सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आण्णासाहेब मगर स्टेडियम मैदानामध्ये “कोरोना” (COVID-19) केअर सेंटर उभारणे व अनुषंगिक कामे करणेकामाच्या निविदा पुर्व कामासाठी मे.एम.इ.पी.सिस्टीम सोलुशन्स प्रा. लि. यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेस तसेच सदरचे कामापोटी एकूण रक्कम रू.१/- (अक्षरी रक्कम रू.एक फक्त) एवढी फी सर्व करांसहित अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२५० विषय क्रमांक – १४

दिनांक – १५/०७/२०२०

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.भिमाबाई फुगे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव –

ठराव क्र.७१६० दि. १७/०६/२०२० मध्ये अ.क्र.१ व अ.क्र.५ या कामाकरिता ३ महिने अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी होईल त्या कालावधीपर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे. सदर कामाकरिता ३ महिने ऐवजी ६ महिने मुदतवाढ अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी होईल तोपर्यंत मुदतवाढ देणेत येत आहे अशी दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२५१ विषय क्रमांक – १५

दिनांक – १५/०७/२०२०

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.भिमाबाई फुगे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव –

भारत सरकार सी.एस.आर. (Corporate Social Responsibility) उपक्रमाद्वारे विविध कंपनी अथवा मोठ्या अस्थापना यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राच्या ठिकाणी सी.एस.आर. Activity द्वारे विविध प्रकारच्या नागरी सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत राजपत्र यापुर्वीच प्रसिध्द केलेले आहे. सदर Activity पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरामध्ये राबविणेसाठी सी.एस.आर. अंतर्गत नागरी सेवा उपलब्ध करावयाची कार्यवाही करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सी.एस.आर.कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. सी.एस.आर. Activity अंतर्गत महापालिकेचे कामकाज आणखी सुलभ प्रभावी व जलद होणेकामी महापालिके करिता सी.एस.आर. सल्लागार नियुक्ती करणेकामी कार्यवाही करणेकामी श्रीम.श्रृतिका बाग – मुंगी Corporate Social Worker यांना CSR क्षेत्रामद्ये ५ वर्ष ९ महिने इतका अनुभव असुन त्यांनी यापुर्वी स्त्रेह फाऊंडेशन याठिकाणी काम केलेले असुन सद्यस्थितीत त्या संपर्क फाऊंडेशन याठिकाणी कार्यरत आहेत तसेच त्यांनी टाटा मोटर्स, मायक्रोलाईस, गोदरेज, ई.सी.एस. व रेडलाईन कंट्रोल या ठिकाणी CSR Events यशस्वीरित्या पुर्ण केलेले असून त्यांना मे.टाटा मोटर्स यांच्या कडून ब्रेव्हरी अवार्ड आणि एकनिष्ठ युवा मंच पुणे यांच्या कडून शौर्यवीर पुरस्कार प्रदान करणेत आलेले आहे. तरी श्रीम.श्रृतिका बाग – मुंगी Corporate Social Worker यांची नियुक्ती आपले महापालिकेत केल्यास सी.एस.आर. Activity मध्ये मोलाचे योगदान मिळेल अशी आशा आहे. तसेच त्यांना महापालिकेमार्फत दर महा र.रू.४०,०००/- (अक्षरी र.रू.चाळीस हजार फक्त) इतक्या मानधनावर सहा महिने कालावधीसाठी सी.एस.आर. कक्षामध्ये नियुक्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच त्यांना महापालिकेमार्फत देणेत येणा-या मानधन महापालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान

विभागाकडील सिटी ट्रान्सफोर्मेशन ऑफिस या लेखाशिर्षाखाली खर्च करणेत येईल तरी श्रीम.श्रृतिका बाग – मुंगी Corporate Social Worker यांची सी.एस.आर. Activity सुलभ, प्रभावी व जलदरितीने होण्याकरिता नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/६६४/२०२०
दिनांक – १५/०७/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.